RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक ९२] बुधवार, जुलै ३०, २०२५/श्रावण ८, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २९५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुलै २०२५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक वशिअ-१३२५/प्र.क्र. ३१/वि.चौ.१.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (सुधारणा) नियम, २०२५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ९ ऐवजी पुढील नियम ९ दाखल करण्यात येईल :—

"९. वृत्तपत्रे व इतर माध्यमे यांच्याशी संपर्क ठेवण्यास प्रतिबंध.—

(१) कोणताही शासकीय कर्मचारी, संपूर्णतः किंवा अंशतः स्वतःच्या मालकीचे कोणतेही वृत्तपत्र किंवा इतर नियतकालिक प्रकाशन किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यम चालवू शकणार नाही किंवा त्यांचे संपादन किंवा व्यवस्थापन करण्यात सहभागी होऊ शकणार नाही :

परंतु, शासनास कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला, ज्यामध्ये केवळ अराजकीय स्वरूपाच्या प्रकारच्या बाबी समाविष्ट असतात असे वृत्तपत्र किंवा नियतकालीक प्रकाशन किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यम स्वतःच्या मालकीत ठेवण्यास किंवा चालविण्यास किंवा त्यांचे संपादन किंवा व्यवस्थापन करण्यात सहभागी होण्यास परवानगी देता येईल आणि परवानगी काढून घेण्याविरूद्ध कारणे दाखविण्याची संधी त्या शासकीय कर्मचाऱ्याला दिल्यानंतर, कोणत्याही वेळी अशी परवानगी काढून घेता येईल.

(२) कोणताही शासकीय कर्मचारी, शासनाच्या किंवा विहित प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेखेरीज किंवा त्याच्या कर्तव्यांच्या खऱ्याखुऱ्या अनुपालनाच्या वेळी असेल ते खेरीजकरून—

स्वतःच्या नावाने किंवा निनावी किंवा टोपणनावाने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावानेः

(अ) पुस्तक प्रकाशित करू शकणार नाही, किंवा पुस्तकाला किंवा मजकुराच्या संकलनाकरिता मजकूर देऊ शकणार नाही; किंवा

(ब) आकाशवाणीवरील ध्वनिक्षेपित भाषणात किंवा वृत्तपत्राला किंवा नियतकालिकाला लेख किंवा पत्र पाठवू शकणार नाही; किंवा

(क) इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होऊ शकणार नाही.

परंतु,—

(एक) जर असे प्रकाशन प्रकाशकामार्फत प्रकाशित केले जात असेल आणि ते केवळ साहित्यिक, कलात्मक किंवा वैज्ञानिक स्वरूपाचे असेल आणि शासनाच्या धोरणाविरुद्ध नसेल ; किंवा

(दोन) जर असे लेखन, भाषण हे केवळ साहित्यिक, कलात्मक किंवा वैज्ञानिक स्वरूपाचे असेल आणि शासनाच्या धोरणाविरुद्ध नसेल ; किंवा

(तीन) जर असे इलेक्ट्रॉनिक मिडियावरील प्रसारण हे केवळ साहित्यिक, कलात्मक किंवा वैज्ञानिक स्वरूपाचे असेल आणि शासनाच्या धोरणाविरुद्ध नसेल,

तर अशा मंजुरीची आवश्यकता असणार नाही.

(३) कोणताही शासकीय कर्मचारी, कोणत्याही आकाशवाणीवरील ध्वनीक्षेपित भाषणामध्ये किंवा वृत्तपत्राला किंवा नियतकालिकाला लिहिलेल्या लेख किंवा पत्रामध्ये किंवा निनावी किंवा स्वतःच्या नावाने किंवा अन्य व्यक्तीच्या नावाने प्रकाशित झालेल्या दस्तऐवजामध्ये किंवा जाहीर भाषणात किंवा सार्वजनिक ठिकाणी किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यम याद्वारे प्रसारीत होणाऱ्या कार्यक्रमात अथवा समाज माध्यमाद्वारे—

(अ) ज्यामध्ये शासनाच्या किंवा भारतातील अन्य कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलिकडच्या धोरणावर किंवा कृतीवर प्रतिकूल टीका असेल :

परंतु, या नियमांतील, नियम १ च्या उप नियम (३) व (४) च्या तरतुदीमध्ये निर्दिष्ट केलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही श्रेणीमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, या कलमात समाविष्ट असलेली कोणतीही गोष्ट अशा सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींचे रक्षण करण्यासाठी किंवा त्यात सुधारणा करण्यासाठी कामगार संघटना किंवा सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनेचा पदाधिकारी म्हणून त्याने केलेल्या प्रामाणिक मतांच्या अभिव्यक्तीला लागू होणार नाही; किंवा

(ब) ज्यामुळे शासन आणि केंद्र शासन व भारतातील अन्य कोणतेही शासन यांच्यामधील हितसंबंध अडचणीत टाकले जातील; किंवा

(क) ज्यामुळे भारत सरकार आणि विदेशी सरकार यांच्यामधील हितसंबंध अडचणीत टाकले जातील; किंवा

(ड) ज्यामुळे त्याची व्यक्तिगत गाऱ्हाणी पुढे मांडली जातील,

असे कोणतेही वस्तुनिष्ठ विधान करू शकणार नाही किंवा कोणतेही मत व्यक्त करू शकणार नाही:

परंतु, या पोट-नियमातील कोणतीही गोष्ट, त्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या पदाच्या नात्याने किंवा त्याच्यावर सोपविलेल्या कर्तव्यांच्या योग्य अशा पालनाच्या वेळी केलेल्या कोणत्याही विधानांना किंवा व्यक्त केलेल्या मतांना लागू होणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुचिता महाडिक,**
शासनाच्या सहसचिव.

क्रमांक वशिअ-१३२५/प्र.क्र. ३१/वि.चौ.१,
**सामान्य प्रशासन विभाग**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ३० जुलै २०२५.

प्रति,

(१) राज्यपालांचे सचिव,
(२) अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
(३) सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
(४) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
(५) विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा,
(६) विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद,
(७) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
(८) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
(९) सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
(१०) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
(११) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
(१२) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
(१३) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
(१४) सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
(१५) सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
(१६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
(१७) आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
(१८) सर्व मंत्रालयीन विभाग,
(१९) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,
(२०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
(२१) विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
(२२) सर्व विधीमंडळ सदस्य,
(२३) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
(२४) निवडनस्ती.

**सुचिता महाडिक,**
शासनाच्या सहसचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 30th July 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. VASHIA 1325 / CR31/ DE1.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Services (Conduct) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Conduct) (Amendment) Rules, 2025.

2. In the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979 for rule 9 the following rule shall be substituted, namely :—

"9. Prohibition against connection with press or other media.—

(1) No Government servant shall, own wholly or in part, or conduct or participate in the editing or management of any newspaper or other periodical publication or electronic media:

Provided that, the Government may permit any Government servant to own or conduct or participate in the editing or management of any newspaper or periodical or publication or electronic media which contains matters of purely non-political nature or character, and may, after giving an opportunity to the Government servant to show cause against withdrawal of permission, at any time withdraw the permission.

(2) No Government servant shall, except with the previous sanction of the Government or of the prescribed authority or except in the *bonafide* discharge of his duties—

(*a*) publish a book himself or through a publisher, or contribute an article to a book or a compilation of articles; or

(*b*) participate in a radio broadcast or contribute an article or write a letter to a newspaper or periodical; or

(*c*) telecast through any electronic media,

either in his own name or anonymously or pseudonymously or in the name of any other person:

Provided that, no such sanction shall be required —

(*i*) if such publication is through a publisher and is purely literary, artistic or scientific character and which is not against the policies of the government; or

(*ii*) if such contribution, broadcast or writing is of a purely literary, artistic or scientific character and which is not against the policies of the government; or

(*iii*) if such telecast, on electronic media is of a purely literary, artistic or scientific character and which is not against the policies of the government.

(3) No Government servant shall, in any radio broadcast, or in a letter or article to a newspaper or periodical or in any document published or telecast through any electronic media or post on social media anonymously, or in his own name or in the name of any other person or in any public utterance or in any public place make any statement of fact or express any opinion—

(*a*) which has the effect of an adverse criticism of any current or recent policy or action of the Government or any other Government in India:

Provided that, in case of any Government servant included in any category of Government servants specified in the sub rule (3) and (4) of rule 1, of these rules,

nothing contained in this clause shall apply to *bonafide* expression of views by him as an office-bearer of a trade union or association of Government servants for the purpose of safeguarding the conditions of service of such Government servants or for securing an improvement thereof; or

(*b*) which is capable of embarrassing the relations between the Government and any other Government in India; or

(*c*) which is capable of embarrassing the relations between the Government of India and the Government of any foreign State; or

(*d*) which has the effect of airing his personal grievances:

Provided that, nothing in this sub-rule shall apply to any statements made or views expressed by a Government servant in his official capacity or in the due performance of the duties assigned to him."

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

SUCHITA MAHADIK,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

No. VASHIA 1325 / CR31/ DE1,
**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**
Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
Dated 30th July 2025.

Copy forwarded to :

(1) The Secretary to the Governor,

(2) The Secretary to the Chairman, Maharashtra Legislative Assembly,

(3) The Secretary to the Speaker, Maharashtra Legislative Council,

(4) The Principal Secretary to the Chief Minister,

(5) The Leader of Opposition, Maharashtra Legislative Assembly,

(6) The Leader of Opposition, Maharashtra Legislative Council,

(7) The Chief Secretary to Government,

(8) All Additional Chief Secretaries/ All Principal Secretaries/ All Secretaries to Government,

(9) All Private Secretaries/ Personal Assistants to Ministers and Ministers of State,

(10) Registrar, High Court (Original Side), Mumbai,

(11) Registrar, High Court (Appellate), Mumbai,

(12) Registrar, Maharashtra Administrative Tribunal, Mumbai,

(13) Registrar, Office of the Lok Ayukta and Upa Lok Ayukta, Mumbai,

(14) Secretary, Maharashtra Legislative Assembly Secretariat, Mumbai,

(15) Secretary, Maharashtra Legislative Council Secretariat, Mumbai,

(16) Secretary, Maharashtra Public Service Commission, Navi Mumbai,

(17) Commissioner, State Election Commission, Mumbai,

(18) All Departments of Mantralaya,

(19) All Heads of Departments and Heads of Offices under the several Departments of the Mantralaya,

(20) Director General, Directorate of Information and Public Relation, Mumbai (5 Copies),

(21) All members of legislature,

(22) Legislature Library, Vidhan Bhavan, Mumbai (10 copies),

(23) All desks in the General Administration Department.

(24) Select File.

SUCHITA MAHADIK,
Joint Secretary to Government.